# महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

## पुराभिलेख संचालनालय, मुंबई -३२

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (२) मधील तरतूदीनुसार

# पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय अंतर्गत पुराभिलेख संचालनालय
## नागरिकांची सनद

**प्रस्तावना :-**

पुराभिलेख संचालनालय ही महाराष्ट्र शासनाची केंद्रीय अभिलेखागार म्हणून विकसित झालेली संस्था आहे. या संचालनालयाची मुंबई, पुणे, कोल्हापूर,औरंगाबाद व नागपूर येथे अप्रचलित अभिलेखांची अभिलेखागारे असून मंत्रालयात समप्रचलित अभिलेखांचे अभिलेख कक्ष स्थापित आहेत. या संचालनालयात मागील चार शतकापासून ते आजतागायतचे अभिलेख जतन करून ठेवण्यात आले असून त्याचे परिरक्षण,संशोधन, संवर्धन व प्रकाशनाचे कर्तव्य या संचालनायाकडून पार पाडले जाते आणि शासनास ते वेळोवेळी संदर्भासाठी उपलब्ध करून दिले जातात. शासनाच्या या विभागाची स्थापना इ.स.१८२९ मध्ये झालेली आहे.

**संचालनालयाची संरचना**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली पुराभिलेख संचालनालयाचे कार्य चालते. सार्वजनिक व खाजगी अभिलेखाचे संपादन/संरक्षण व शासकीय विभाग/कार्यालयांना संदर्भासाठी अभिलेख उपलब्ध करून देणे तसेच संशोधकांना संशोधनासाठी परवानगी व अभिलेख उपलब्ध करून देण्याचे प्रमुख कर्तव्य संचालनालयातर्फे करण्यात येते. अभिलेखागारातील छापील अभिलेख जनतेस पाहण्यासाठी उपलब्ध करून दिला जातो. तसेच त्याच्या प्रमाणित प्रती दिल्या जातात. अभिलेखांचे संपादन व तो उपलब्ध करून देणे, पाहू देणे, या बाबी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ आणि महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम २००७ च्या तरतूदीनुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येते. या संचालनालयाशी संबंधित कामकाज करण्यासाठी पुढीलप्रमाणे विषयाचे वाटप व शाखांची निर्मिती करण्यात आली आहे.

| नियंत्रण अधिकारी | पर्यवेक्षक अधिकारी | शाखा अधिकारी | विषय |
|---|---|---|---|
| संचालक | सहाय्यक संचालक (प्रशासन) | कनिष्ठ अधीक्षक | १) आस्थापनाविषयक बाबी<br>२) लेखाविषयक बाबी<br>३) आवक जावक<br>४) भांडार खरेदी व स्टेशनरी<br>५) विधान मंडळ अधिवेशन संबंधी बाबी<br>६) माहितीचा अधिकार अधिनियम |
| | सहाय्यक संचालक (संशोधन) | अभिलेखाधिकारी (संकलन) | १) मोडी अभिलेखांचे सूचीकरण<br>२) सन १८२० नंतरच्या इंग्रजी अभिलेखाच सूचीकरण<br>३) शासकीय/निमशासकीय कार्यालयातील अभिलेखांची तपासणी<br>४) मोडी प्रशिक्षण वर्ग<br>५) राज्यस्तरीय छाननी समिती<br>६) सार्वजनिक व खाजगी अभिलेखांचे संपादन<br>७) राजपत्राच्या प्रमाणित प्रती संबंधी प्रकर<br>८) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम/नियम अंमलबजावणीबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अभिलेखाधिकारी (संशोधन) | १) इ.स.१८२० पूर्व अभिलेखांचे सूचीकरण<br>२) संशोधन विषयक प्रकरणे<br>३) संदर्भ ग्रंथालय<br>४)ऐतिहासिक कागदपत्राचे प्रदर्शन |
| | | अभिलेखाधिकारी (अभिलेख व्यवस्थापन) | १) अभिलेखांचे जतन व संवर्धन<br>२) अभिलेखांचे आवक जावक<br>३) इतिहास संशोधकांना परवानगी व अभिलेख उपलब्ध करून देणे.<br>४) मंत्रालयीन विभागाना मागणीपत्रानुसार अभिलेख देणे व परत घेणे |
| | | अभिलेखपाल (मंत्रालय अभिलेख कक्ष) | १) मंत्रालयातील समप्रचलित अभिलेखांचे संपादन व मंत्रालयीन विभागात मागणीप्रमाणे अभिलेख देणे व परत घेणे |
| | | रसायनशास्त्रज्ञ | १)अभिलेखांची रासायनिक तपासणी व दुरुस्ती बांधणी<br>२) झेरॉक्स |
| | | मुख्य छायाचित्रकार | १)अभिलेखांचे सूक्ष्मचित्रीकरण |
| | सहाय्यक संचालक (प्रकाशन) | प्रकाशन अधिकारी | १) विभागाने तयार केलेल्या सामग्रीतून संकलन व प्रकाशन<br>२) अभिलेख सीडी रोमवर घेणेबाबत. |
| | सहाय्यक संचालक पुणे पुरालेखागार | अभिलेखाधिकारी | १) पुणे पुरालेखागारातील अभिलेखांचे संपादन<br>२) सूचीकरण व संशोधन<br>३) अभिलेख सीडी रोमवर घेणे<br>४) माहितीचा अधिकारी अधिनियम विषयक प्रकरणे |
| | | अभिलेखपाल | १) अभिलेखाच्या प्रमाणित प्रती<br>२) इतिहास संशोधकांना अभिलेख उपलब्ध करून देणे |
| | | वरिष्ठ लिपीक | १) आस्थापना व लेखा विषयक बाबी<br>२) आवक जावक |
| | सहाय्यक संचालक कोल्हापूर पुरालेखागार | अभिलेखाधिकारी | १) कोल्हापूर पुरालेखागारातील अभिलेखांचे संपादन<br>२) सूचीकरण व संशोधन<br>३) अभिलेख सीडी रोमवर घेणे<br>४) माहितीचा अधिकार अधिनियम विषयक प्रकरणे |
| | | अभिलेखपाल | १) अभिलेखाच्या प्रमाणित प्रती<br>२) इतिहास संशोधकांना अभिलेख उपलब्ध करून देणे |
| | | वरिष्ठ लिपीक | १) आस्थापना व लेखा विषयक बाबी<br>२) आवक जावक |

| | | | |
|---|---|---|---|
| | सहाय्यक संचालक मराठवाडा पुरालेखागार | अभिलेखाधिकारी | १) मराठवाडा पुरालेखागारातील अभिलेखांचे संपादन<br>२) सूचीकरण व संशोधन<br>३) अभिलेख सीडी रोमवर घेणे<br>४) माहितीचा अधिकार अधिनियम विषयक प्रकरणे |
| | सहाय्यक संचालक विदर्भ पुरालेखागार | अभिलेखाधिकारी | १) विदर्भ पुरालेखागारातील अभिलेखांचे संपादन<br>२) सूचीकरण व संशोधन<br>३) अभिलेख सीडी रोमवर घेणे<br>४) माहितीचा अधिकार अधिनियम विषयक प्रकरणे |

पुराभिलेख संचालनालय हे योजनेत्तर खाली असून या संचालनालयाच्या कोणत्याही योजना नाहीत या संचालनालयासाठी नेमण्यात आलेले राज्य जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांची यादी कार्यालयीन आदेश क्र. इएसटी-१०२००४/७९, दिनांक ६ जानेवारी २००४ अन्वये घोषित करण्यात आली आहे.

# पुराभिलेख संचालनालयाचे रचनात्मक विवरणपत्र

